# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/03/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## जबरी चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा गोंडखैरी टोलनाक्याजवळ श्री. जैनरा यांचे शेतात दिनांक ०७/०३/२०२३ चे ००.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— बाजीराव भगवान धुर्वे, वय ६० वर्ष व्याहाळ पेठ नागपूर हा आपल्या ठेक्याचे शेतात एकटाच आपले मालकीच्या बकऱ्यासह राहतो. घटना ता. वेळी व ठिकाणी यातील अज्ञात ४ आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी जवळ येवून चाकुचा धाक दाखवून फिर्यादीचे मालकीच्या लहान मोठया एकुण २५ बकऱ्या किंमती अंदाजे ७५,०००/— रू. च्या पांढऱ्या रंगाचे चार चाकी वाहनात टाकुन फिर्यादीला ईच्छापुर्वक दुखापत करून जबरी चोरी करून पळाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीतांविरुध्द कलम ३९४, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सोलसे पोलीस स्टेशन कळमेश्वर मो. क्र. ७०३८०४६३९९ हे करीत आहे.

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कुही:— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे अप. क्र. ३५२/२०१९ कलम ३७६(अ), (ब) भांदवि. सहकलम ४, ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

फिर्यादी ही घरात काम करीत असता यातील आरोपी नामे— सुरज राजकुमार शेडके, वय २३ वर्ष, रा. अडम ता. कुही जि. नागपूर हा पाणी पिण्याच्या बहाण्याने फिर्यादीचे घरात गेला व फिर्यादीची अल्पवयीन पिडीत मुलगी हिचे सोबत जबरी संभोग केला.

सदर प्रकरणाचे तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी पौर्णिमा तावरे मॅडम यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक ०८/०३/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी. जे. पांडे सा. नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३७६ (३) भांदवि. मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व १०,०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०१ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी परसोडकर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस हवालदार ब. नं. ११५१ दिलीप लांजेवार पोस्टे. कुही यांनी मदत केली आहे.

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा ईतवारी पेठ उमरेड येथे दिनांक ०७/०३/२०२३ चे १२.१५ वा. ते १२.३० वा. दरम्यान आरोपी नामे— आशीष अरूणराव लाखे, वय ३३ वर्ष, रा. वार्ड क्र. ९ पंकज किराणा स्टोअर्स जवळ ईतवारी पेठ उमरेड हा हातामध्ये धारदार चाकु घेवुन आरडाओरड करीत आहे अशी माहीती पोलीस स्टेशनच्या फोनवर हेमलता सोनटक्के रा. ईतवारी पेठ उमरेड यांनी सांगीतल्याने पोलीस स्टेशन उमरेड येथील पोलीस स्टाफ हा घटनास्थळी पोहचले असता सार्वजनिक रहदारीचे रोडवर लोकांच्या गर्दीमध्ये नमुद आरोपी हा हातामध्ये धारदार चमकणारा हत्तीमार चाकु घेवुन लोकांच्या मागे धावतांना दिसुन आला. होळी सणाच्या निमित्त मा. जिल्हाधिकरी यांचें आदेश क्रं अजिंद/गृह/कक्ष १४ (२)कवि २८७/२०२३ दि ०३/०३/२३ अन्वये संपुर्ण नागपूर ग्रामीण जिल्हयात दि. ०५/०३/२०२३ चे ००.०१ वा. ते ९/०३/२०२३ चे २४.०० वा. पर्यंत कलम १३५ मुपोका अन्वये नमुद कालावधीत कोणत्याही प्रकारचे घातक व शरीरास ईजा होणारे शस्त्र बाळगण्यास मनाई असतांना सुदधा आरोपीने वरील वर्णनाचा हत्तीमार चाकु बाळगतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस शिपाई अमोल मांढरे ब. नं. ३८९ पोस्टे उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा सहकलम १३५ मुपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ८२८ आशिष खोडे ९४२३६०५०७१ हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर